दाखल दिनांक – १३/११/२०१९
नोंदणी दिनांक – १४/११/२०१९
निर्णय दिनांक – १३/०९/२०२२
कालावधी– ०३ वर्षे, १० महिने, ०० दिवस

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सोलापूर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारीः मनोज ज. मोहोड)

**नियमित फौ.ख.क्र. १३०४/२०१९**

नि.क्र.

CNR:MHSO ०३०१४१६३२०१९

महाराष्ट्र सरकार तर्फे )
पोलीस स्टेशन अधिकारी, )
सलगर वस्ती पोलीस स्टेशन, सोलापूर. ) **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

१. कविता बापु चव्हाण, )
वय – ४५ वर्षे, धंदा – घरकाम, )
२. रिना बापु चव्हाण, )
वय – २६ वर्षे, धंदा –घरकाम, )
३. रविना विजय काळे, )
वय – २४ वर्षे, धंदा –घरकाम, )
४. विजय भारत काळे, )
वय – २९ वर्षे, धंदा – मजुरी, )
५. पंकज नाना काळे, )
वय – ३२ वर्षे, धंदा – व्यापार, )
आरोपी क्र.१ ते ५ रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.१, )
पारधी कँप,सोलापूर. )
६. सौ.उमा पंकज काळे, )
वय – २९ वर्षे, धंदा – गृहिणी, )
आरोपी क्र.५ व ६ रा. मु.पो.सरपडोह, )

| | | |
|---|---|---|
| ता.करमाळा, जि.सोलापूर. | ) | |
| ७. रामदास भारत काळे, | ) | |
| वय – ३६ वर्षे, धंदा – जुरी, | ) | |
| रा.३०८, सर्वसुखी नगर, मोरे मंदिर शेजारी, | ) | |
| शहा नगर जवळ, सोलापूर. | ) | **आरोपी.** |

---

अभियोगक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ताः श्री– ए. पी. काळे.
आरोपींतर्फे विद्वान विधीज्ञः श्री. जे.ए.गायकवाड

---

**<u>न्यायनिर्णय</u>**

**( दिनांक १३/०९/२०२२ रोजी पारीत )**

आरोपींविरुध्द कलम ३२३, ३२४, ३३७, ५०४, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ भारतीय दंड संहिता, १८६० (थोडक्यात,"संहिता१८६०") अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याकरीता संपरीक्षा चालविण्यात येत आहे.

**<u>अभियोगपक्षाचा थोडक्यात खटला असा आहे कीः</u>**

२. दिनांक ३१/०५/२०१९ रोजी रात्री ०९.०० वाजणेच्या सुमारास फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र. १) हिने आरोपींविरुध्द पोलीसांत तक्रार दिल्याचा राग मनात धरुन आरोपींनी तिला तसेच तिचा भाऊ प्रशांत काळे, काकू– सौ.सविता वसंत काळे यांना शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. तसेच आरोपी क्र.४ याने हातात दगड घेवून प्रशांत काळेला डोक्यात मारुन जखम केली. तसेच आरोपींनी वसंत काळे व सविता हे सोडविण्यास गेले असता आरोपी क्र.३ हिने रस्त्यातील दगड उचलून सविताच्या दिशेने मारला असता तिच्या डोक्यात जखम

झाली. म्हणून फिर्यादीने आरोपींविरुध्द पोलीस स्टेशनला फिर्याद दिली.

३. फिर्यादीच्या तक्रारीवरुन, आरोपींविरुध्द गुन्हृयाची नोंद घेण्यात आली. पोलिसांनी आरोपींचा अटकेचा पंचनामा केला. घटनास्थळ पंचनामा तयार करण्यात आला. जप्ती पंचनामा तयार केला. चार दगडं, एक शर्ट जप्त करण्यात आले. साक्षीदारांचे जबाब नोंदविण्यात आले. तपास पुर्ण झाल्यानंतर, आरोपींविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपींविरुध्द निशाणी १२ प्रमाणे कलम ३२३, ३२४, ३३७, ५०४, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ भारतीय दंड संहिता,१८६० (थोडक्यात,"संहिता१८६०") अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्याचा तपशील तयार केला. आरोपींना तपशील समजावून सांगीतला असता, त्यांनी गुन्हा कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षा चालविण्याची मागणी केली.

५. अभियोगपक्षाचा खटला, तसेच विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विद्वान विधीज्ञ यांच्या सादरीकरणावरुन खालील मुद्दे निर्धारणाकरीता उद्भवतात, त्यास सकारण निष्कर्ष नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय की, दिनांक ३१/०५/२०१९ रोजी रात्री ०९.०० वाजणेचे सुमारास फिर्यादी हिचे सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.१, पारधी कँप, सोलापूर राहते घरी, आरोपींनी गैर कायदयाची मंडळी जमवून संगनमत करुन फिर्यादीची काकू सौ.सविता वसंत काळे (स.सा.क्र.२) व फिर्यादीचा भाऊ प्रशांत काळे, | |

| | | |
|---|---|---|
| | (स.सा.क्र.३) यांना दगडाने मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली व त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३२४ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला? | नकारार्थी |
| २. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय कि, वर नमुद, दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या गैर कायदयाची मंडळी जमवून संगनमत करुन, फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र.१) व साक्षीदार यांना मारहाण करुन दुखापत पोहचविली व त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३२३ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ३. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय कि, वर नमुद, दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या गैर कायदयाची मंडळी जमवून संगनमत करुन, फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र.१) व साक्षीदार यांचे जीवित किंवा व्यक्तिगत सूरक्षितता धोक्यात आणला व त्याद्वारे भा.दं.वि. कलम ३३७ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ४. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय कि, वर नमुद, दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या गैर कायदयाची मंडळी जमवून संगनमत करुन, फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र.१) व साक्षीदार यांना शांतता भंग घडवून आणण्याच्या उददेशाने अपमान केला व त्याद्वारे भा.दं.वि. कलम ५०४ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ५. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय कि, वर नमुद, दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या गैर कायदयाची मंडळी जमवून संगनमत करुन, फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र.१) व साक्षीदार यांच्या घरी गैरकायदयाने जमाव जमवली, व त्याद्वारे भा.दं.वि. कलम १४३ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ६. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय कि, वर नमुद, दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या गैर कायदयाची मंडळी जमवून संगनमत करुन, फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र.१) व साक्षीदार यांना मारुन शिक्षेस पात्र गुन्हा केला व त्याद्वारे भा.दं.वि. कलम १४७ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ७. | अभियोगपक्ष सिध्द करतो काय कि, वर नमुद, दिवशी, वेळी व ठिकाणी, आरोपींनी त्यांच्या गैर कायदयाची मंडळी जमवून संगनमत करुन, फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र.१) व साक्षीदार यांच्या घरी गैरकायदयाने दंगा करण्याच्या उद्देशाने दगड असे शस्त्र आणून जमाव जमवली, व त्याद्वारे भा.दं.वि. कलम १४८ सह कलम १४९ नुसार गुन्हा केला? | नकारार्थी. |
| ८. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरीता फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र. १), फिर्यादीची काकू सौ.सविता वसंत काळे (स.सा.क्र. २) व फिर्यादीचा भाऊ प्रशांत काळे, (स.सा.क्र. ३) यांचा साक्षीपुरावा नोंदविला आहे. फिर्यादी व आरोपींचे न्यायालयाबाहेर आपसात झाल्याचे निदर्शनास येते. त्यानुसार त्यांनी नि.२० नुसार पुरसिस दाखल केलेली आहे. फिर्यादी व साक्षीदार यांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे व त्यांची तडजोड झाल्यामुळे, निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा बंद केला. तसेच आरोपींच्या विरुध्द पुरावा नसल्यामुळे, त्यांचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ अंतर्गत बयान

वगळण्यात आले.

७. विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपींचे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकण्यात आला.

**मुद्दा क्र.१ ते ७ करीताः**

८. मुद्दा क्र.१ ते ७ एक दुस–याशी संबंधीत असल्यामुळे पुनरावृत्ती टाळण्याच्या दृष्टीने एकत्र चर्चा करण्यात येत आहे.

९. फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण (स.सा.क्र. १) हिचा निशाणी २३, फिर्यादीचा भाऊ प्रशांत काळे, (स.सा.क्र. ३) याचा निशाणी २६ व फिर्यादीची काकू सौ.सविता वसंत काळे (स.सा.क्र. २) निशाणी २५ च्या साक्षीपुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, त्यांनी घटना २ वर्षापुर्वी संध्याकाळी घरासमोर घडल्याचे सांगितले. घटनेच्यावेळेस तिची व आत्त्या व तिच्यात तोंडी किरकोळ वादावादी झाली होती. म्हणून ती पोलीस स्टेशनला गेली होती. फिर्यादीने फिर्यादीवरील सही मान्य केली असली तरी त्यातील मजकूर तिने स्पष्टपणे नाकारला. साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे, विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता, यांनी त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले असता, त्याने फिर्यादी, प्रविणा महेश चव्हाण हिने तिच्या फिर्यादीतील "अधोरेखांकिंत भाग अ" आणि फिर्यादीचा भाऊ प्रशांत काळे व फिर्यादीची काकू सौ.सविता वसंत काळे यांनी त्यांच्या बयानातील "अधोरेखांकिंत भाग अ"पोलीसांना सांगितला नसल्याचे कथन केले व तसेच उलटतपासादरम्यान, त्यांच्यात न्यायालयाबाहेर आपसामध्ये प्रकरण मिटल्याचे मान्य केले आहे. या प्रकरणामध्ये

आरोपींनी जप्ती पंचनामा व साक्षीदारांचे न्यायवैद्यकिय प्रमाणपत्र कबूल केले असले तरी सदर बाबी आरोपींविरूध्द गुन्हा सिध्द होण्याइतपत पुरेशा नाहीत. अभिलेखावर आलेला पुरावा लक्षात घेता असे निदर्शनास येते की, अभियोग पक्ष आरोपींविरूध्द भा. दं. वि., १८६० कलम ३२३, ३२४, ३३७, ५०४, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ भारतीय दंड संहिता,१८६० नुसार ठेवलेले आरोप सिध्द करू शकला नाही. परिणामतः मुद्दा क्रमांक १ ते ७ चा निष्कर्ष हा **नकारार्थी** नोंदविण्यात येत आहे.

**मुद्दा क्र. ८ करीताः**

१०. मुद्दा क्र.१ ते ७ करीता केलेल्या चर्चेवरुन, आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतो. करीता पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपींची कलम ३२३, ३२४, ३३७, ५०४, १४३, १४७, १४८ सह कलम १४९ संहिता,१८६० अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या गुन्ह्यातून कलम २४८(१) संहिता, १९७३ अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपी व जामीनदारांची बंधपत्र रद्द करण्यात येत आहेत.

३. आरोपींनी कलम ४३७–अ संहिता,१९७३ प्रमाणे माननीय अपीलार्थी न्यायालयाने नोटीस निर्गमीत करुन हजर राहण्यास आदेशीत केल्यास अपिलार्थी न्यायालयासमक्ष हजर राहण्याबाबत प्रत्येकी १५,०००/– रुपयांचे वैयक्तिक बंधपत्र आणि तेवढयाच रकमेचा जामीनदार द्यावे.

४. जप्त मुद्देमाल, ४ दगडं व एक पांढ–या रंगाचा फुल बाहयाचा शर्ट, हे मुल्यहीन असल्याने, त्याची अपील कालावधी संपल्यानंतर, नियमाप्रमाणे विल्हेवाट

लावण्यात यावी.

५. न्यायनिर्णय खुल्या न्यायकक्षामध्ये आरोपींच्या समक्ष घोषित करण्यात आला.

MANOJ JANARDAN MOHOD
Digitally signed by MANOJ JANARDAN MOHOD
Date: 2022.11.22 17:34:34 +0530

(मनोज ज. **मोहोड** )

१३ सप्टेंबर, २०२२ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,सोलापूर.

**CERTIFICAT E**

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per original Judgment/Order.

(a)Name of the Stenographer :-Sadafule M.P.(G.2)

(b)Court :- J.M.F.C.Solapur

(c)Judgment/Order Signed by P.O. On :-13/09/2022

(d)Judgment/Order uploaded on :November 22, 2022.